# स्त्रियांनी अलंकार घालण्यामागील शास्त्र

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 卐 | ग्रंथाच्या संकलकांचा परिचय | ५ |
| 卐 | आध्यात्मिक परिभाषेतील प्रस्तावना | ७ |
| 卐 | ग्रंथात दिलेल्या सूक्ष्मातील प्रयोगांची वैशिष्ट्ये | १० |
| 卐 | मनोगत | ११ |
| १. | स्त्रियांनी अलंकार घालण्याचे महत्त्व आणि लाभ | १३ |
| २. | भावनाप्रधानता जास्त असलेल्या स्त्रियांनी कोणत्या प्रकारचे अलंकार परिधान करावेत ? | २३ |
| ३. | विधवांनी अलंकार परिधान का करू नयेत ? | २५ |
| ४. | अलंकार घालणारी आणि न घालणारी स्त्री | २७ |
| ५. | सर्वसामान्य स्त्री आणि वाईट शक्तींचा त्रास असणारी स्त्री यांच्यावर अलंकारांचा होणारा परिणाम | २९ |
| ६. | अलंकार परिधान करण्यासंदर्भातील सूक्ष्मातील प्रयोग | ४३ |
| ७. | अलंकार घालण्याविषयी व्यावहारिक सूचना | ६६ |
| ८. | अलंकारांची अनावश्यकता कोणाला ? | ६७ |
| 卐 | संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन | ६८ |

# मनोगत

'हिरेजडित मुकुट शोभतो बरा । रुणझुणती नुपूरे चरणी घागरिया ॥....' देवताही जेथे अलंकारांनी विभूषित असतात, तेथे मनुष्यजिवांचे काय ? स्त्रीजातीसाठी तर अलंकार म्हणजे, स्त्रीचे लावण्य आणि शालीनत्व जपणारा सहस्रो वर्षांपासूनचा अनमोल सांस्कृतिक वारसा. स्त्रीसाठी अलंकार ही केवळ शोभेची वस्तू नसून स्त्रीला ईश्वरी चैतन्य प्रदान करणारा आणि तिच्यातील देवत्व जागृत करणारा तो एक महत्त्वाचा घटक आहे, हे या लघुग्रंथात शास्त्रासह सांगितले आहे.

सध्याच्या कलियुगात जवळजवळ प्रत्येकालाच अल्प-अधिक प्रमाणात वाईट शक्तींचा त्रास असतो. अतृप्त पूर्वज, वाईट शक्ती इत्यादींच्या त्रासांपासून रक्षण करण्यात अलंकार मोलाची भूमिका कशी पार पाडतात, हेही या लघुग्रंथात दिले आहे. तसेच अलंकार नुसतेच परिधान करण्यापेक्षा वेळोवेळी त्यांना विभूती लावून परिधान करणे किती श्रेयस्कर आहे, हे एका साधिकेने त्या संदर्भात केलेल्या सूक्ष्म ज्ञानाविषयीच्या

प्रयोगांवरून लक्षात येते. यावरून अलंकारांच्या शुद्धीचे महत्त्वही कळते. स्त्रियांचे विविध अलंकार, त्यांचे महत्त्व आणि ते परिधान करून केलेले सूक्ष्म ज्ञानाविषयीचे प्रयोग यांविषयीचे विवेचन अलंकारविषयक मालिकेतील निरनिराळ्या ग्रंथांत केले आहे.

या लघुग्रंथामुळे अलंकारांचे महत्त्व कळून अशी चैतन्यमय देण देणार्‍या हिंदु धर्माचे महत्त्व लक्षात यावे, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**


## अलंकारांसंबंधी अध्यात्मशास्त्रीय दृष्टीकोन देणारे सनातनचे ग्रंथ !

- अलंकारांचे महत्त्व
- स्त्री-पुरुषांचे अलंकार
- बिंदीपासून कर्णभूषणांपर्यंतचे अलंकार
- कंठभूषणांपासून मेखलेपर्यंतचे अलंकार
- हाता-पायांत घालायचे अलंकार


